# छत्रपती संभाजी महाराज जयंती साईयोग फाउंडेशनकडून साजरी




**राहाता (वार्ताहर)–** येथील साईयोग फाउंडेशनद्वारे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती नगरपालिकेच्या योगभवनात उत्साहात साजरी करण्यात आली. महिलांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

दशरथ तुपे यांनी सूत्रसंचालन केले. साईयोग फाउंडेशनचे ॲड. दिगंबर धनवटे यांनी प्रास्ताविक केले. प्रविण खंडीझोड म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज केवळ शूरवीर योद्धेच नव्हते तर तब्बल सोळा भाषांचे जानकर, प्रकांड पंडित आणि आध्यात्माचे अभ्यासक होते. युवकांनी स्वराज्यनिष्ठा, स्वाभिमानी बाणा याचबरोबर व्यसनमुक्ती, स्त्रियांचा आदर अधिक गुणांचा अंगीकार करावा. महिला सदस्य साईशा चव्हाण हिने गर्जना देत नवचैतन्य निर्माण केले. शेवटी फाऊंडेशनचे बबलू फटांगरे यांनी आभार मानले.

याप्रसंगी साईयोग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. बापूसाहेब पानगव्हाणे, अनुराधा तुपे, निलम चेणुके, उज्वला गाडेकर, विलास वाळेकर, भाऊसाहेब बनकर, मनोज पिपाडा, संदिप डांगे, सिताराम बावके, अरविंद बावके, प्रताप गमे, संजय वाघमारे, दीपक दंडवते, प्रकाश पुंड, विठ्ठल निर्मळ, पांडुरंग गायकवाड, अनिल सातव, सुभाष दंडवते, परमेश चव्हाण, विष्णू गाडेकर, रंगनाथ सदाफळ, कैलास चेनुके, शिवाजी पोटे, संतोष बावके, भास्कर बावके, ज्ञानेश्वर शेटे, प्रणव लावर, सार्थक तुपे, अर्जुन चव्हाण आदी उपस्थित होते.

# कोळपेवाडी-शहा रस्त्यावर गतिरोधक बसवल्याने अपघाताची मालिका खंडित

**कोळपेवाडी (प्रतिनिधी)–** नगर-नाशिक सरहद्दीला जोडणाऱ्या कोळपेवाडी-शहा रस्त्यावर शहाजापूर हद्दीत गौतम पब्लिक स्कुलच्या पाठीमागे रस्त्यावर असणाऱ्या यु टर्नवर गतिरोधक बसवल्याने अपघाताची मालिका खंडित झाली आहे. साई सेवा प्रतिष्ठान सेवाभावी संस्था कोळपेवाडी यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग कोपरगाव यांच्याकडे पत्रव्यवहार करून आ. आशुतोष काळे यांचे या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते.

कोपरगाव-कोळपेवाडी हा सावळीविहीर भरवस राज्य मार्गाला ओलांडून नाशिक जिल्हा सरहद्द विघनवाडी गावच्या रस्त्याला जोडणारा प्रमुख मार्ग असल्याने यावर रहदारी मोठ्या प्रमाणात असते. गौतम पब्लिक स्कूलच्या पाठीमागे रस्त्यावर यु टर्न असल्याने वाहने समोरासमोर येऊन अनेक अपघात घडत होते. अपघातात अनेकजण जायबंदी होऊन काहींना मोठ्या अपघातास सामोरे जावे लागले होते. या प्रश्नाकडे साई सेवा प्रतिष्ठानने सार्वजनिक बांधकाम उपविभाग कोपरगाव यांच्याकडे पत्रव्यवहार करून आ. आशुतोष काळे यांचे लक्ष वेधत आंदोलनाचा इशारा दिला होता. आ. काळे यांनी सदर रस्ता दुरुस्ती विशेष निधी अंतर्गत २५० लक्ष रुपये मंजुरी मिळवली होती. कोपरगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता वर्षराज शिंदे यांनी या मागणीची दखल घेत ठेकेदार मोरे यांना गतिरोधक बसवण्यास सांगितले. गतिरोधक बसवल्याने वारंवार घडणारे अपघात कमी झाल्याची माहिती स्थानिक रहिवाशी गंगाधर धायगुडे यांनी दिली. साईसेवा प्रतिष्ठान सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष भाऊसाहेब वाघडकर, रावसाहेव मोरे, वाल्मिक जाधव, सोमनाथ गोर्डे, भाऊसाहेब धुंदे यांनी यासाठी प्रयत्न केले.

# बेलापूर केंद्रात प्रथम आलेल्या चारही विद्यार्थिनी उक्कलगाव शाळेच्या

## उक्कलगाव न्यू इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल ८९.६१ टक्के



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून खा.गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल, उक्कलगाव या विद्यालयाचा निकाल शेकडा ८९.६१ टक्के लागला असून उत्कृष्ट निकालाची परंपरा विद्यालयाने कायम राखली आहे.

विद्यालयाच्या कु.श्रध्दा प्रवीण थोरात (९५.२० टक्के) प्रथम ,कु.सिध्दी सतीश थोरात (९४.६० टक्के) द्वितीय, समृध्दी चंद्रभान थोरात (९४.२० टक्के) तृतिय, कु. श्वेता अण्णासाहेब गायके (९३.२०) या चारही विद्यार्थिनी बेलापूर केंद्रासह विद्यालयात प्रथम चार मध्ये आल्या आहेत. तर कु. वैष्णवी सिताराम मुसमाडे (८८.२०) व श्वेता जगन्नाथ धनवटे (८८.१०) या विद्यार्थिनींनी अनुक्रमे पाचवा व सहावा क्रमांक पटकावला आहे.

विद्यालयातून एकूण ८२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे बेलापूर केंद्रातील प्रथम चार मध्ये आलेल्या चारही विद्यार्थिनी उक्कलगाव शाळेच्या आहेत.सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना प्राचार्य उत्तमराव गोरे, कैलासराव उंडे, वाघमोडे, विश्वनाथ बडाख, प्रकाश पारखे, श्रीमती रोहिणी बनकर, श्रीमती भगत, श्रीमती बेलकर या विषय शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल सर्व शिक्षक व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या चेअरमन पुष्पलता आदिक, सचिव अविनाश आदिक, माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा अनुराधा आदिक, देखरेख संघाचे अध्यक्ष इंद्रनाथ थोरात, सह सचिव जयंत चौधरी, गव्हर्निंग काउन्सिल सदस्य नितीन पवार, हंसराज आदिक, गव्हर्निंग काउन्सिल सदस्य तथा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील बन्सी थोरात शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ यांनी कौतुक केले आहे.

# देशाचे ५२ वे सरन्यायाधीश बनले बी. आर. गवई

## देशातील दुसरे दलित सरन्यायाधीश

**नवी दिल्ली–**न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांनी काल भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती गवई यांना सरन्यायाधीशपदाची शपथ दिली. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपला.

सरन्यायाधीश खन्ना यांच्यानंतर न्यायमूर्ती गवई यांचे नाव ज्येष्ठता यादीत होते. म्हणूनच न्यायमूर्ती खन्ना यांनी त्यांचे नाव पुढे केले. त्यांचा कार्यकाळ फक्त ७ महिन्यांचा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवरील त्यांच्या प्रोफाइलनुसार, न्यायमूर्ती गवई यांना २४ मे २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली. त्यांची निवृत्ती तारीख २३ नोव्हेंबर २०२५ आहे. न्यायमूर्ती गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्रातील अमरावती येथे झाला. त्यांनी १९८५ मध्ये त्यांच्या वकिली कारकिर्दीला सुरुवात केली. १९८७ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्र वकिली सुरू केली. यापूर्वी त्यांनी माजी ॲडव्होकेट जनरल आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश दिवंगत राजा एस. भोसले यांच्यासोबत काम केले. १९८७ ते १९९० पर्यंत मुंबई उच्च न्यायालयात प्रॅक्टिस केली. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून नियुक्ती. १४ नोव्हेंबर २००३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून पदोन्नती. १२ नोव्हेंबर २००५ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयाचे कायमस्वरूपी न्यायाधीश झाले. न्यायमूर्ती गवई हे देशातील दुसरे दलित सरन्यायाधीश असतील. त्यांच्या आधी न्यायमूर्ती केजी बालकृष्णन हे भारताचे सरन्यायाधीश झाले. २००७ मध्ये न्यायमूर्ती बालकृष्णन सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बनले.

# शत्रू राष्ट्रांना धडकी भरवणार भारताचं 'भार्गवास्त्र'

## एकाचवेळी अनेक ड्रोन हल्ले रोखण्यास सक्षम



**नवी दिल्ली–** भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदीचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर दोन्ही देशांमधील तणाव काहीसा कमी झाल्याचं पाहायला मिळत आहे. या तणावादरम्यान भारताने पाकिस्तानकडून होणारे सर्व ड्रोन हल्ले हाणून पाडले. भारत आपली सुरक्षा कायम मजबूत करत असल्याचं पाहायला मिळतं. आता भारताला 'भार्गवास्त्र' ही एक नवीन स्वदेशी काउंटर ड्रोन प्रणाली मिळाली आहे. भारताने काल (१४ मे २०२५) ओडिशातील गोपाळपूर येथे स्वदेशी अँटी-ड्रोन सिस्टम मभार्गवस्त्रफ्ची यशस्वी चाचणी घेतली. 'भार्गवास्त्र' ही ड्रोन प्रणाली एकाच वेळी अनेक ड्रोनवर मारा करण्यास सक्षम असल्याचं सांगितलं जात आहे.

१३ मे २०२५ रोजी ओडिशातील गोपाळपूर येथे आर्मी एअर डिफेन्स च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत रॉकेटच्या तीन चाचण्या घेण्यात आल्या. प्रत्येकी एक रॉकेट डागून दोन चाचण्या घेण्यात आल्या. एक चाचणी दोन सेकंदात साल्वो मोडमध्ये दोन रॉकेट डागून घेण्यात आली. अहवालानुसार, सर्व रॉकेटनी अपेक्षेप्रमाणे कामगिरी केली आणि आवश्यक प्रक्षेपण मापदंड साध्य केले, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात ड्रोन हल्ले रोखता येतील.

**भार्गवास्त्राचा पल्ला २.५ किमीपर्यंत**

भार्गवास्त्र हे मानवरहित हवाई वाहन धोक्यांचा सामना करण्यासाठी सक्षम आहे. यात द्वि-स्तरीय मारक यंत्रणा आहे. याच्या पहिल्या थरात दिशाहीन मायक्रो रॉकेट्स तैनात केले आहेत, जे २० मीटरच्या अंतरातील ड्रोनच्या ताफ्याला उद्ध्वस्त करण्यात सक्षम आहे. याचा मारक पल्ला २.५ किमीपर्यंत आहे. तर, दुसऱ्या थरामध्ये अचूक लक्ष्य साधणारं मार्गदर्शित सूक्ष्म क्षेपणास्त्र आहे. हे भार्गवास्त्र ६ ते १० किमी अंतरावरुन शत्रुला ओळखेल.

एसडीएएलने विकसित केलेली ही प्रणाली मॉड्यूलर आणि भूप्रदेशाशी जुळवून घेणारी असून, ५००० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या प्रदेशात देखील कार्य करण्यास सक्षम आहे. यामुळे ती भारतीय सशस्त्र दलांच्या मोहिमांमध्ये मोठी भूमिका बजावू शकते. मभार्गवास्त्रफ्चे रडार ६ ते १० किमी अंतरावरील लो रडार क्रॉस-सेक्शनमध्ये हवाई लक्ष्य शोधू शकते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानने ज्या पद्धतीने तुर्की आणि चिनी ड्रोनचा वापर केला त्यावरून हे स्पष्ट झाले आहे की भविष्यात भारताला नवीन ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर रोखावा लागणार आहे.

**भार्गवास्त्राच्या नावाचा इतिहास खास**

महाभारतात काही विध्वंसक अस्त्र वापरले गेले होते. यापैकी एक भार्गवास्त्र देखील होते. ज्याचे नाव महर्षी भार्गव परशुराम यांच्या नावावर ठेवण्यात आले होते. त्यामुळं भार्गवास्त्रच्या नावाचा इतिहास खास आहे. आता या नावापासून प्रेरणा घेऊन, भारताने एक अत्याधुनिक सूक्ष्म-क्षेपणास्त्र आधारित काउंटर-ड्रोन प्रणाली विकसित केली आहे. भारताच्या ताफ्यात सामील झालेले हे नवीन मभार्गवास्त्रफ आधुनिक युद्धात देशाच्या सुरक्षेला एका नवीन उंचीवर नेण्यासाठी सज्ज आहे.

# राष्ट्रीय श्रीराम संघ व शिवसेना पक्षाच्या वतीने शहिद जवानांच्या कुटुंबियांसाठी १ लाख रूपयांची मदत



**राष्ट्रीय श्रीराम संघ व शिवसेना पक्षाच्या वतीने श्रीरामपुरात ऑपरेशन सिंदुर दरम्यान शहीद जवानांच्या स्मरणात तिरंगा रॅली काढण्यात आली व शहीद जवानांच्या कुटुंबासाठी राष्ट्रीय श्रीराम संघाच्या वतीने एक लाख रुपयांचा आर्थिक मदतीची रक्कम पोलिस निरिक्षक नितीन देशमुख यांच्याकडे सुपुर्द करताना राष्ट्रीय श्रीराम संघाचे प्रमुख सागर बेग, शिवसेना महिला आघाडीच्या शहर प्रमुख सौ. सविताताई वाडीले, रवींद्र जाधव, आकाश बेग, सागर शेटे, सुनील शेळके, अशोक तुपे, समीर माळवे, प्रकाश मेहत्रे, गणेश करमासे, सनी थोरात, प्रसाद दळवी, राजेश वाव्हळ, विशाल जाधव, सुनिल पाचोणे आदी मान्यवर.**

# न्यू इंग्लिश स्कूल व ज्यूनिअर कॉलेजचा निकाल शंभर टक्के

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** येथील न्यू इंग्लिश स्कूल अ‍ॅण्ड ज्यूनिअर कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला. एकूण ५४ विद्यार्थी एसएससी २०२५ या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.

यश बाबासाहेब थोरात याने ९५.८० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक मिळवला. मीत इंद्रसेन अग्रवाल याने ९३.२० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. नहूश शेखर जोशी याने ९२.४० टक्के गुण मिळवून तिसरा, श्रेयस संतोष सातपुते याने ९२.२० टक्के चौथा तर तनिषा दीपक जगधने हिने ९२ टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक पटकविला.

यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक दत्तात्रय घोगरे तसेच शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीराम टेकावडे, सेक्रेटरी प्रतिक्षित टेकावडे, खजिनदार जन्मजय टेकावडे, गव्हर्निंग कौन्सिल सुरेश ओझा, ॲड. दादासाहेब औताडे, प्राचार्य दत्तात्रय घोगरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## पान १ वरुन

# शाळेपासून १ किमी परिसरात पान टपरी नको

फुटेज किमान एक महिना जपून ठेवावे लागणार आहे. याचाच अर्थ शाळांना सीसीटीव्हीचा एक महिन्यांचा बॅकअप असणं आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांविरुद्धचे गुन्हे पोलिसांना कळवणे आवश्यक आहे.

राज्य सरकारच्या नव्या नियमावलीनुसार, शाळा प्रशासनाला आता कर्मचाऱ्यांची कसून तपासणी करावी लागणार आहे आणि स्कूल बसच्या चालकांची नियमितपणे अल्कोहल टेस्ट करावी लागणार आहे. मानसिक दबावाखाली असलेल्या किंवा त्रासलेल्या विद्यार्थ्यांना समुपदेशन देणे आणि लहान मुलांना 'गुड टच' आणि 'बॅड टच' बद्दल माहिती देणे हे देखील या नियमांचा भाग आहे.

**सरकारने जीआरमध्ये काय म्हटलं आहे?**

जीआर नुसार, १८ वर्षांखालील प्रत्येक व्यक्तीला अल्पवयीन मानले जाईल. शाळेत कोणताही गुन्हा घडल्यास, त्याची माहिती तातडीने जवळच्या पोलीस स्टेशनला किंवा स्पेशल जुवेनियल पोलीस युनीट म्हणजे विशेष बाल कल्याण पोलीस विभागला देणे बंधनकारक आहे.

सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे अनिवार्य आहे. कॅमेऱ्यांचे फुटेज किमान एक महिना जपून ठेवावे लागेल. नियमांचे पालन न केल्यास, सरकारी अनुदान रोखणे किंवा शाळेची मान्यता रद्द करणे यासारखी कारवाई केली जाऊ शकते, असा इशारा देण्यात आला आहे.

शाळा प्रशासनाने कर्मचाऱ्यांची कसून तपासणी करावी. आवश्यक असल्यास, उमेदवारांकडून चारित्र्य प्रमाणपत्र मागवावे. शक्यतोवर, पूर्व-प्राथमिक ते इयत्ता सहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी महिला शिक्षकांची नियुक्ती करावी, असे आदेशात म्हटले आहे.

शाळेत बस असल्यास, चालकांची आणि इतर कर्मचाऱ्यांची नियमितपणे अल्कोहल टेस्ट करणे आवश्यक आहे. प्रत्येक स्कूल बसमध्ये एक महिला कर्मचारी असणे अनिवार्य आहे.

विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि जनजागृती यावर भर देताना, जीआरमध्ये शाळांना महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने तयार केलेले 'Chirag application' वापरण्यास सांगितले आहे. हे application बालकांच्या हक्कांशी संबंधित माहिती देण्यासाठी आणि तक्रार दाखल करण्यासाठी आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांवरील होणाऱ्या अत्याचाराची तक्रार दाखल करण्याबाबत, POCSO e-Box या राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने तयार केलेल्या सुविधेबाबतची माहिती तसेच महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने तयार केलेल्य ॲपची माहिती, सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यासाठी शाळेमध्ये सूचना फलक लावावेत. तसेच या ॲपवर तक्रारी नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत करावी. सर्व मुख्याध्यापकांनी आणि शिक्षकांनी ही सुविधा सर्व विद्यार्थ्यांच्या निर्देशनास आणून यासंदर्भातील आवश्यक ती माहिती सर्वांना द्यावी.

# श्रीरामपुरात पोलिसांनी ड्रग सदृश पावडर पकडली

नोकरी सोडून चार महिन्यापूर्वी श्रीरामपूर एमआयडीसी मध्ये भाड्याने घेतलेल्या गोदामातून ही पावडर उचलण्यात आली आहे. या कारवाईत पकडलेला टेम्पो या तरुणाच्या . धनगरवाडी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथील मामाच्या मुलाच्या मालकीचा आहे. दरम्यान घटनास्थळी अपर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे व पोलिस उपाधिक्षक डॉ. शिवपुजे यांनी भेट दिली. त्यांच्या उपस्थितीत या गोडावूनचे कुलूप तोडून गोडावूनची तपासणी करण्यात आली. मात्र तेथे काय सापडले याची माहिती उपलब्ध होवू शकली नाही. या कारवाईत पकडलेली ही ड्रग सदृस्य पावडर फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठविण्यात येणार असून त्यासाठी या पावडरचे नमुने पोलिसांनी घेतले आहेत. त्याचा अहवाल आल्यानंतरच ही पावडर नेमकी कशाची याचा उलगडा होणार आहे. ही ड्रग असेल तर त्याचे तेलंगणाशी काही कनेक्शन आहे का? याचाही शोध पोलिस घेत आहेत.

# राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची कोणतीही चर्चा नाही!

खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्यात हस्तक्षेप करू नये. अजित पवार यांच्यावर खालच्या पातळीवर टीका करणाऱ्यांनी माफी मागितल्याशिवाय त्यांना विलिनीकरणात सामावून घेऊ नये, अशीही मागणी काही आमदारांनी या बैठकीत केल्याचे सूत्रांनी सांगितले. मात्र विलिनीकरणाची कोणतीही चर्चा सुरू नाही. एकत्र येण्याबाबत कुणीही कोणताच प्रस्ताव मांडलेला नाही. त्यामुळे चर्चा होण्याचा सध्या तरी विषय नाही, असे सांगत अजित पवारांनी ही चर्चा थांबवली.

**शरद पवार म्हणाले होते...**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटासोबत जाण्याबाबत आपल्या पक्षात दोन मतप्रवाह आहेत. आपण पुन्हा एकत्र यावे, असा एक मतप्रवाह आहे. तर भाजपशी आपण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हातमिळवणी करू नये. इंडिया आघाडीसोबत राहूनच ही आघाडी पुन्हा संघटित करावी, असा दुसरा मतप्रवाह पक्षात असल्याची माहिती शरद पवार यांनी इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत दिली होती. पक्षातील एक गट अजित पवार यांच्यासोबत जाण्यास इच्छुक असल्याची कबुली खुद्द पवार यांनी दिल्याने राष्ट्रवादीच्या वर्तुळात दोन्ही गटाच्या मनोमीलनाची चर्चा रंगली होती.

# गाळ काढण्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करा : ना. विखे पाटील

घेतला असून यामध्ये मुळा (अहिल्यानगर), उजनी (सोलापूर), गिरणा (नाशिक), गोसीखुर्द (भंडारा), जायकवाडी (छत्रपती संभाजीनगर) आणि हातनुर (जळगाव) या धरणांचा समावेश आहे. या प्रकल्पांमधून मिळणाऱ्या अनुभवाच्या आधारे अन्य धरणांमध्येही ही प्रक्रिया राबवली जाणार आहे.

गाळ काढताना त्या-त्या ठिकाणाची भौगोलिक परिस्थिती, गाळ आणि वाळूचे प्रमाण यांचा सखोल अभ्यास करण्यावर मंत्री विखे पाटील यांनी भर दिला. केवळ गाळावर नव्हे तर वाळूवरही लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गाळ काढण्याची जबाबदारी संबंधित महामंडळांकडे असावी व निविदा प्रक्रियेपूर्वी सविस्तर सर्व्हेक्षण करून गाळ आणि वाळूचे प्रमाण निश्चित करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवताना विधी व न्याय विभागाचा अभिप्राय, पर्यावरण मान्यता व इतर सर्व वैधानिक बाबींची पूर्तता करणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अशा प्रकारची संपूर्ण पारदर्शक व शास्त्रशुध्द कार्यपध्दती अंगीकारल्यास राज्यातील धरणांच्या जलधारण क्षमतेत लक्षणीय वाढ होऊ शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# नगर अर्बन बँक घोटाळ्यातील संशयित आरोपी अद्याप मोकाट

दिसले, अशी गंभीर टीका चोपडा यांनी केली आहे. त्यांनी म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 'ना खाऊंगा ना खाने दूंगा' ही धोरणनिती असूनही, राज्यातील काही मंत्र्यांच्या आश्रयामुळे आरोपी मोकाट फिरत आहेत. त्यामुळेच पोलीस प्रशासन कारवाईस टाळाटाळ करत आहे.

बँक बचाव समितीच्या वतीने चोपडा यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना आवाहन केले आहे की, राज्याचे गृहमंत्री म्हणून आपण या प्रकरणात तात्काळ लक्ष घालून, पोलीस प्रशासनाला कठोर कारवाईचे आदेश द्यावेत. तसेच, बँक बचाव समितीला भेटून या गंभीर प्रकरणावर चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा, अशी नम्र मागणीही त्यांनी केली आहे. नगर अर्बन बँकेतील घोटाळ्यामुळे हजारो खातेदार, गुंतवणूकदार आणि सेवक आर्थिक अडचणीत सापडले असून, आरोपींवर कठोर कारवाईची मागणी दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहे.

# गोगलगावातील दोन मुलांचा ओढ्याच्या पाण्यात बुडून मृत्यू

ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. किरण हा नुकताच आठवी इयत्ता उत्तीर्ण झाला होता तर साहिल लोणी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकत होता. या घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. चौधरी कुटुंबाला धीर देण्यासाठी अनेक नातेवाईक पोहचले. प्रवरा रुग्णालयात दोघांचे शवविच्छेदन केल्यानंतर सायंकाळी गोगलगाव येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शरद पवार गटाच्या बैठकीत स्थानिक निवडणुकांवर चर्चा

हिरवा कंदील दाखवला आहे. त्यामुळे या निवडणुका दिवाळीनंतर म्हणजे येत्या नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये होण्याची दाट शक्यता आहे. या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शरद पवार गटाच्या बैठकीत निवडणूक तयारीवर चर्चा करून स्थानिक नेत्यांना योग्य त्या सूचना करण्यात आल्या.

दरम्यान, जयंत पाटील यांच्या उपस्थितीत आज लातूर येथील माजी जिल्हा परिषद सदस्य माधव जाधव तसेच लातूरच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला. त्यावेळी, महा पक्ष सोडणार, तो पक्ष सोडणार असे काही लोक म्हणत आहेत. पण ज्या लोकांना भविष्य दिसत नाही ते इकडे तिकडे जातील. पण आपण शरद पवार यांचा विचार घेऊन काम करत आलो आहोत आणि पुढेही करत राहू, असा विश्वास जयंत पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

# भेसळयुक्त 'अनॉलॉग पनीर' अन्न व औषध प्रशासनाच्या रडारवर

यांनी अन्न व औषध प्रशासनाला भेसळीविरोधात तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानंतर प्रशासनाने जिल्ह्यात व्यापक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. श्रीगोंद्याचे आमदार विक्रम पाचपुते यांनीही यापूर्वी विधिमंडळात भेसळयुक्त पनीर उत्पादनाचा मुद्दा उपस्थित केला होता. अनेक हॉटेल चालकांकडून अशा भेसळयुक्त अनॉलॉग पनीरची सर्रास खरेदी करून ग्राहकांना दिली जात आहे. मात्र ग्राहकांसाठी ठेवण्यात येणाऱ्या रेडकार्डवर त्याचा उल्लेख नसल्याने, ग्राहक अनावधानाने हेच पनीर खाऊन आपल्या आरोग्याशी तडजोड करत आहेत. जिल्ह्यात भेसळयुक्त अनॉलॉग पनीरचा वापर वाढल्याने ग्राहकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनाने केलेल्या कारवाईमुळे संबंधित उत्पादन कंपन्या आणि हॉटेल्सवर वचक बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, ग्राहकांनी पॅकिंगवरील तपशील काळजीपूर्वक वाचावा आणि हॉटेलमध्ये दिले जाणाऱ्या पनीर विषयी चौकशी करावी. अनधिकृत किंवा अनियमिततेची माहिती असल्यास अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**३० नमुन्यांची तपासणी**

अन्न व औषध प्रशासनाने मागील चार महिन्यांत जिल्ह्यातील ३० हॉटेल्स आणि पनीर उत्पादकांकडे धाड टाकून नमुने गोळा केले आहेत. हे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले असले तरी बहुतेक अहवाल प्रशासनाकडे अद्याप आलेले नाहीत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर कारवाई होणार असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सांगण्यात आले.